PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दि. २७.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

# पार्ले महोत्सवातील स्पर्धकांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन

मुंबई :१५ व्या पार्ले महोत्सवाच्या सातव्या दिवशीही अनेक कलावंतांनी नामवंत क्रीडापटूंनी भेट देऊन खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले. विश्वनाथ आनंद सारखे खेळाडू शाळेत असतानापासुन हजारो वेळा बुद्धीबळचा खेळ खेळले व त्यातुनच त्यांचा खेळ पक्का झाला. त्यामुळे आपल्या मुलांचा एक गट करुन त्यांना शक्य तेवढे खेळू द्या असा सल्ला एशिया क्वीन, अर्जुन पुरस्कार विजेत्या पद्मश्री अनुपमा गोखले यांनी बुद्धीबळ स्पर्धेचे उद्‌घाटन करताना पालकांना दिला. तर खेळताना केवळ आपल्या ध्येयावर म्हणजेच टार्गेटवर लक्ष ठेवण्याची सवय लावल्यास बोर्ड कॅरम मध्ये स्टार्ट टू फिनिश करणे अवघड नाही, असे अर्जुन पुरस्काराचे मानकरी विजय संगम यांनी सांगितले. आपल्यामधील कलागुण अधिक कुशल करण्यावर या वयात लक्ष केंद्रीत करावे, असा सल्ला सुप्रसिध्द क्रिकेटपटू अमोल मुजुमदार यांनी दिला. मागिल १५ वर्षात पार्ले महोत्सवाची उत्तरोत्तर झालेली वाढ पाहुन आपणास पार्लेकर असल्याचा अभिमान वाटतो आहे, असेही ते म्हणाले. बुद्धिबळ स्पर्धेची सुरुवात अनुपमा गोखले व विजय संगम यांनी बुध्दीबळाचा डाव खेळून केली.

पार्ले महोत्सवातील सर्वात लोकप्रिय असलेला 'पार्ले महोत्सव श्री' या शरिरसौष्ठव स्पर्धेत १५० हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. विपीन पिटर याने यंदाचा१५ व्या पार्ले महोत्सवाचा 'पार्ले महोत्सव श्री' हा किताब पटकावला. तर विराज सरमळकर हा उपविजेता ठरला. बेस्ट पोझरचा किताब प्रणित माने याला मिळाला. भारतीय आणि महाराष्ट्र बॉडी बिल्डींग असोसिएशन्सच्या पदाधिकाऱ्यांनीही या वेळी स्पर्धेचे कौतुक करत मुख्य आयोजक आमदार ॲड.पराग अळवणी यांचे आभार मानले. दादोजी कोंडदेव पुरस्काराचे मानकरी श्री. भाई कदम यांच्या हस्ते विजेत्यांना किताब देण्यात आले. अर्जुन पुरस्कार सन्मानित व 'भारत श्री' श्याम रहाटे यांनी उपस्थित २ हजाराहून अधिक तरुण प्रेक्षकांना व्यायाम कसा करावा याची माहिती दिली.

कला स्पर्धेत १२ ते १६ वयोगटातील मुलांच्या नृत्यस्पर्धेचे उद्‌घाटन सुप्रसिध्द कलाकार मयुरेश पेम यांच्या हस्ते झाले. वयाच्या आठव्या वर्षापासून स्पर्धक म्हणून येणारा मयुरेश पेम हा काही वर्षांनी परिक्षक म्हणून येत होता. पण यंदा तो स्पर्धेचा उद्‌घाटक म्हणून आला होता. या प्रसंगी त्यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले, स्पर्धकांनी स्पर्धेत बक्षिसासाठी न खेळता स्पर्धेचा आनंद घ्यावा. बालपणी मी पार्ले महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेत भाग घेत होतो आणि या स्पर्धेचा आनंद घेत असतानाच मला नृत्याची आवड निर्माण झाली आणि आज त्यातच माझ करियर केले आहे. मुलांनी पार्ले महोत्सवच्या व्यासपीठाचा उपयोग आपल्यातील सुप्तगुण ओळखण्यासाठी करुन आपल्या करियरला दिशा द्यावी. पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड.पराग अळवणी यांनी सांगितले की, गेल्या १५ वर्षात पार्ले महोत्सवातील स्पर्धांमधून मी अनेक खेळाडू व कलाकारांना घडतना पाहिले आहे आणि यातूनच मला पार्ले महोत्सव दरवर्षी करण्यासाठी प्रेरणा आणि ताकद मिळते.

---

हे पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.